REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 5 | FEBRUARY – 2017

# मतकरींची व्यावसायिक नाटके

प्रविणा नागपूरकर
मराठी विभाग, महिला महाविद्यालय ,नंदनवन ,नागपूर.

नाटक हा नुसता वाचनाचा किंवा नुसता बघण्याचा साहित्यप्रकार नसून तो अनुभवण्याचा ,जगण्याचा साहित्य प्रकार आहे . नव्हे मानवी जीवनाच्या गुंतागुंतीचा वेध घेणार एक आरसा असतो . मतकरी काळाची आणि त्यांच्या स्वतःच्या संस्थेची गरज पाहून ते व्यावसायिक नाटक लेखनाकडे वळलेले आहेत. सन १९७९-८० पासून त्यांनी सातत्याने व्यावसायिक नाट्यलेखन केलेले आढळते. मतकरींचे पहिले नाटक 'वाऱ्यावरचा मुशाफिर आहे. मुंबईच्या नाट्यकलोपासक संस्थेने आयोजित केलेल्या नाट्यलेखन स्पर्धेत या नाटकाला पहिला क्रमांक मिळाला होता. लेखनस्पर्धा घेणाऱ्या संस्थेनेच हे नाटक रंगभूमीवर



आणले. रामचंद्र बर्वे यांनी हे नाटक दिग्दर्शित केले होते. डिसे. १९५९ ला याचा प्रथम प्रयोग झाला. यात भाऊ बिवलकर, रतन किनरे, शंकरराव भोसले यांच्या प्रमुख भूमिका होत्या. हा प्रयत्न तितकासा परिणामकारक ठरला नाही. पण मतकरींच्या 'वर्तुळाचे दुसरे टोक' या दुसऱ्या नाटकाने ही कसर भरून काढली. मानसशास्त्रीय पार्श्वभूमी लाभलेल्या या नाटकाची संदेशकथा अतिशय लक्षवेधी ठरली. मतकरींनी या नाटकाच्या रचनेसाठी पाश्चात्य लेखक नाटककार जे.बी. प्रिस्टले यांच्या 'टाईम प्ले' तंत्राचा वापर केलेला होता. या पद्धतीचा विशेष असा की, जिथे आधीचा अंक संपतो, तिथेच दुसरा अंक सुरू होतो. काळाची एकसूत्रता, सलगता हे मुख्य तत्व त्यामागे आहे. या नव्या तंत्रामुळे त्या काळात दिग्दर्शन आणि अभिनय स्तरावरही हा प्रयोग उत्तम झाला. पारितोषिकही पटकाविले. नव्या तंत्रज्ञानामुळे हे नाटक रसिकांच्या लक्षात राहिले. मतकरींनी आपल्या लेखन उर्जेचा भरपूर वापर सर्वत्र केलेला आहे. सातत्याने नवीन काहीतरी करीत राहणे हा त्यांचा स्वभावच आहे. या काळातील नाट्यलेखन स्पर्धेसाठी त्यांनी सातत्याने विविध स्पर्शी आणि विपुल लेखन केलेले आहे. हे लेखन करीत असतांना विषय, आशय, रचनातंत्र यांमध्ये तोचतोचपणा, एकसुरीपणा येऊ नये याची विशेष काळजी मतकरींनी घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक प्रयोगाचे स्वागतच होत गेले. उदाहरणार्थ १९६६ सालच्या स्पर्धेत ‘ब्रह्महत्या' हे नाटक सादर झालेले होते. तशी ही एका रहस्यमय खुनाची कथा होती. परंतु ती पारंपारिक पद्धतीने न हाताळता मानसशास्त्रीय पद्धतीने हाताळली. शिवाय या रहस्यकथेत विनोदाचा वापर केल्याने त्यातील व्यक्तिरेखा लक्षणीय झाल्या.

रत्नाकर मतकरी या वादळी व्यक्तिमत्वाचा लौकिक आणि वाङ्मयीन प्रवास हा फार वैशिष्ट्य पूर्ण आहे. शरीर आणि आत्मा यांचा जसा संबंध असतो तसे मतकरींचे लौकिक जीवन आणि नाटक यांना वेगळे करता येणार नाही. त्यांच्या प्रत्येक नाटकाच्या निर्मितीची कथा त्यांच्या आयुष्यातील लहान-मोठ्या अशा कोणत्यातरी अनुभवांशी निगडीत आहे. मतकरींचे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगता येईल की एकदा एक विषय त्यांच्या डोक्यात आला की, तो प्रत्यक्षात उतरेपर्यंत, त्या नाटकाची प्रत्यक्ष निर्मिती होईपर्यंत डोक्यात ठाण मांडून असतो. आणखी एक गमतीची बाब त्यांनी वि. भा. देशपांडे यांना दिलेल्या मुलाखतीत सांगितली आहे. ती अशी की, "ते एका विषयावर काही लिहित असताना सर्वस्वी विरूद्ध असा दुसरा एखादा विषयही त्यांच्या डोक्यात तेवढ्याच तीव्रतेने घोळत राहतो."" याचे उदाहरण म्हणजे त्यांचे 'आरण्यक' हे पौराणिक विषयावरील नाटक होय. हे नाटक जेव्हा अस्तित्वात आले तेव्हा ते एका सामाजिक विषयावरील नाटकाचे लेखन करीत होते.

प्रत्येक साहित्यिक आपली सामाजिक जबाबदारी ओळखून आपापल्या अंगाने, प्रतिभा सामर्थ्याने आपली कलाकृती पूर्णत्वाला नेत असतो हे त्याचे कार्य या मानवी जीवनाच्या शोधाला हातभारच लावीत असते. तो जे बघतो, अनुभवतो त्याचे कमीजास्त प्रमाणात प्रतिबिंब त्याच्या साहित्यातून उमटत राहते आणि त्या साहित्यिकाच्या प्रकृतीनुसार ते ते जीवनदर्शन अथवा ती ती कलाकृती वेगवेगळ्या रूपात अवतरत राहते. रत्नाकर मतकरींनी व्यावसायिक रंगभूमीसाठी १९७९ ते २००७ दरम्यान एकूण २५ नाटके लिहिली. पहिल्या लेखनाचा १५-२० वर्षाचा अनुभव गाठीशी होता. नाटक आणि रंगभूमी या दोन्ही माध्यमांचे वाचक आणि प्रेक्षक यांच्याशी नेमके नाते काय असते, याचा अंदाज त्यांना आलेलाच होता. आपल्या मनातला विषय आशयासह प्रेक्षकांच्या मनात उतरतोय किंवा नाही याचेही भान त्यांना होतेच. तरी व्यावसायिक नाटकांचे गणित वेगळेच असते. हेही नाकारता येत नव्हते. आपण लिहिलेल्या नाट्यसंहितेला व्यावसायिक नाट्यनिर्माता, कोण मिळेल? कसा मिळेल? त्याची अपेक्षा काय असेल? या प्रश्नासोबतच मराठी प्रेक्षकाला काय हवे? त्यांच्या नाट्याभिरूचीचे समाधान आपल्याला करता येईल कां? ही प्रश्नमालिका चांगली लांबलचक आणि आव्हान देणारी असते. व्यावसायिक रंगभूमीसाठी नाटक लिहिणे आणि ते मोठ्या संख्येने प्रायोगित होणे हे मतकरींना आव्हानच होते. शिवाय आपले नाट्यलेखन तंत्रशरण किंवा प्रयोगशरण न होता, आपल्या मनातील प्रयोगशीलता कायम ठेऊन ते प्रेक्षकाभिरुचीला आव्हान करणारे ठरावे ही सुद्धा कसरतच होती. या सर्व पैलूंना लक्षात घेऊन मतकरींनी १९७९ साली व्यावसायिक रंगभूमीसाठी 'अजून यौवनात मी हे नाटक लिहिले. ही एक चांगली सुखात्मिका आहे. पन्नाशीकडे झुकणाऱ्या पुरूषाची यौवनाची ओढ आणि ते न समजणारी त्याची पत्नी यांच्यातील संघर्षाचे हे नाटक आहे.

'अजून यौवनात मी' नंतर 'अश्वमेध' हे वैचारिक स्वरूपाचे आणि गंभीरतेकडे झुकणारे नाटक मतकरींनी लिहिले. मोठ्या उद्योग व्यवसायात मोठ्या पदावर असणाऱ्या माणसाच्या जीवनात आलेला वैचारिक संघर्ष या नाटकात आहे. यातील नायकाला नाटकांची विशेष आवड आहे. तो नाटकातील वातावरणाने भारलेला आहे. या भारलेपणातून त्याच्या मनात अनेक प्रश्नवादळे निर्माण होतात. वास्तव जीवन आणि हे प्रश्न घेऊन नाटक उभे राहते. या नाटकात रंजनमूल्य तसे माफक प्रमाणात असल्यामुळे हे नाटक व्यवसाय कसा आणि कितपत करेल हा प्रश्न अनेकांना होता, पण उत्तम प्रयोगनिर्मितीने हा प्रश्न मिटविता आला. 'नाट्यसुमन' संस्थेने हे आव्हान स्वीकारून हे नाटक यशस्वी करून दाखविले. त्यानंतरचे नाटक चि.सौ.का.चंपा गोवेकर हे एक गमतीशीर पण रहस्यमय स्वरूपाचे नाटक आहे. त्याच्या शीर्षकानेच सर्वांमध्ये कुतूहल निर्माण केले होते. पण याच्याही आधी मतकरींनी एका परकीय मॅरेज 'इटालियन स्टाईल' या चित्रपटातील मूळ कल्पना घेऊन त्याला मराठी साज चढवित 'पंचेचाळीस हेच लग्नाचे वय' हे नाटक लिहिले होते. यातील मुख्य घटना 'लग्न' होती. मग त्याच्या जोडीने येणारे सर्व नाट्य, कारूण्य या सर्व विषयाबरोबर उतारवयाच्या जाणिवेचा आणि हृदयरोगाच्या संबंधाचाही भाग त्यात आहे. अशा अनेक गोष्टी एकाचवेळी एकाच नाटकात मतकरींनी रंगविल्या आहेत.मतकरींची अन्य नाटके 'माझं काय चुकलं?' 'अग्निदिव्य', 'स्पर्श अमृताचा', 'खोल खोल पाणी' ही नाटके विविध समस्या अधोरेखित करतात. या सर्व समस्यांचे स्वरूप सामाजिक, कौटुंबिक,

मानसिक किंवा व्यक्तिगत असे विविधांगी आहे. जसे हुंडाबळी ही एक जीवघेणी समाजाला वेढून असणारी समस्या 'अग्निदिव्य' मधून व्यक्त झाली आहे. माझं काय चुकलं?' यातून नातेसंबंधातले ताण प्रकर्षाने व्यक्त होतात. स्पर्श अमृताचा' मधून कुष्ठरोग्याच्या आणि समाजाच्या मानसिकतेवर प्रकाश टाकला आहे. एका सुशिक्षित मध्यमवर्गीय घरातील एक सुंदर तरूणी या रोगाला बळी पडते तेव्हा तिच्यासकट संपूर्ण घरादाराची होणारी घुसमट, अगतिकता आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न यात आहेत. त्यासोबत 'रोहिणी' च्या ( कुष्ठरोग बाधित तरूणी) उपचारादरम्यान समाजातील वास्तव, डॉक्टरी व्यवसायातले बारकावे हेही मतकरींनी हुबेहूब चितारले आहे. 'खोल खोल पाणी मधून पौगंडावस्थेतील मुलांची मानसिकता आणि या वयांत होणारे सूक्ष्म बदल, त्यांचा प्रौढतेशी असलेला विलक्षण अनुबंध असा हा गंभीर, गुंतागुंतीचा आणि तरीही महत्त्वाचा असणारा विषय मतकरींनी या नाटकातून हाताळला आहे. तर 'जोडीदार' मध्ये विवाहबाह्य संबंधातून जन्मलेले अपत्य काही वर्षांनी त्या कुटुंबातच्या वर्तमान जीवनात येऊन कसे प्रश्न उपस्थित करते, त्यामुळे कशाप्रकारे ताणतणाव निर्माण होतात याचे विश्लेषण 'जोडीदार' या नाटकात केले आहे. या दोन्हीही गंभीर, आगळ्या विषयावरच्या वेगळ्या नाट्यलेखनाने मतकरींनी व्यावसायिक नाटकांच्या अभिरूचीत मोलाची भर घातली आहे.

आत्मिक आनंदातून, रंगप्रेरणेने काही विनोदी प्रहसनवजा नाटकांचे लेखनही मतकरींनी केले आहे यामध्ये 'अजून यौवनात मी', 'कार्टी प्रेमात पडली', 'चि.सौ.का. चंपा गोवेकर' 'बिऱ्हाड बाजल', 'वटवट सावित्री' इत्यादींचा उल्लेख करता येईल. 'विठो रखुमाय हे सर्वस्वी वेगळ्या विषयावरचे आणि वेगळ्याच आकृतिबंधातले नाटक आहे. विठ्ठलाला मानवी रूपात कल्पून मग त्याच्या कौटुंबिक जीवनाचा वेध यात मतकरींनी घेतला आहे आणि त्यात तुळशीची लोककथा सहजपणे रंगविलेली आहे. या लोककथांतील पात्रांच्या मनस्वितेचे भव्य आणि गूढ परिणाम ठसविण्यासाठी मतकरींनी धनगरी ओव्या, भजने,स्त्रीगीते यांचा मुखडा वापरून मुक्तछंदात या नाटकाचे लेखन केले आहे.

असाच सांगितिक अंगाने लेखनाचा प्रयोग 'तुमचे आमुचे गाणे' या नाटकातही केला आहे. 'जावई माझा भला' हेही एका वेगळ्या धाटणीचे हलके-फुलके विनोदगर्भ नाटक आहे. बाप आणि मुलगी यांच्या हळव्या नात्याची उकल या नाटकात चितारली आहे. 'कर्ता करविता' हे एका पुरुषाच्या अहंकारी वृत्तीमुळे आणि बाहेरख्याली वर्तनामुळे त्याच्या कुटुंबात कशा समस्या निर्माण होतात, पत्नीचे आयुष्य उद्ध्वस्त होते, तसेच पूर्णपणे वडिलांच्या कलाने चालणाऱ्या मुलाच्या आयुष्याला सुरूवात होताहोताच पूर्णविराम मिळतो. कारण वडिलांनी कवडीचीही निर्णय क्षमता मुलांमध्ये विकसितच होऊ दिलेली नसते. हे नाटक मुलाच्या अगतिकतेवर, त्याच्या या परावलंबी वृत्तीवर प्रकाश टाकणारे आहे. 'प्रियतमा' हे एका इंग्रजी सुखात्मिकेवर बेतलेले नाटक आहे. ही एक गीतसंगीत प्रेमकथा आहे ही प्रेमकथा जरी असली तरी यातील नायिका प्रेमात आंधळेपणाने वाहवत जाण्यापेक्षा आपली तत्वे जपत, आपल्या प्रियकराचे दुर्गुण दूर करण्याचा आटापिटा करणारी आहे अशी ही सर्वांगसुंदर हलकी फुलकी प्रेमकथा आहे. साटंलोट' यात प्रौढांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न अतिशय खुमासदारपणे हाताळला आहे. याशिवाय याच पठडीत येणारी 'शुऽऽ' कुठं बोलायचं नाही', 'एकदा पाहावं करून', 'इथं हवंय कुणाला प्रेम', 'जादू तेरी नजर' इत्यादी नाटकांची यादी देता येईल.

मतकरींच्या लेखनाची अशी खूप वैशिष्ट्ये सांगता येतात . अशाच एका आगळ्या वेगळ्या विषयावर लिहिलेले त्यांचे 'प्रेमकहाणी हे नाटक आहे. माणसे व्यवहारात जशी सामान्यपणे वागतात, बोलतात कृती करतात, निर्णय घेतात यावरच नाटक लिहावे असा चंग त्यांनी एक दिवस मनात बांधला आणि खरेच आधी मनात काहीही न ठरविता त्यांनी सहजरित्या नाटक लिहिलेही. तेच हे 'प्रेमकहाणी' नाटक होय. डोक्यात नाटकाचे कथानक तयार असूनही पहिला अंक लिहिल्यावर दुसऱ्या अंकासाठी त्यांना शब्दच सापडेना, काय करावे? या विचारात असतानाच 'कहाणी कुणा प्रेमिकाची' या शीर्षकाखाली त्यांनी ही एकांकिका म्हणून छापून आणलीसुद्धा, तरीही नाटकाचा विचार मनातून जात नव्हता, पिच्छा सोडत नव्हता. यातच पाच-सहा वर्षे उलटून गेली. अर्थात त्यांचे दुसरे लेखन सुरू होतेच. वेळेचा अपव्यय त्यांना मान्य नव्हता आणि एकांकिकेवर ते

समाधानी ही नव्हते. 'प्रेमकहाणी' या नाटकाचा विषय पुन्हा नव्याने त्यांच्या मनात रूंजी घालू लागला आणि एक दिवस ते पूर्ण नाटक रूपात समाजापुढे आले. लोकांना आवडले, लोकप्रियही झाले. ज्ञानाच्या संदर्भात असमाधानी वृत्ती हा त्यांचा गुण इथे कामी आला. नाट्यलेखनाचा हा नवा बाजही समाजाच्या पसंतीस उतरला ही मतकरींना मिळालेली यशाची पावतीच होती. या नाटकातील नेपथ्यबदलाचे वैशिष्ट्य असे की ते नृत्याचा आभास निर्माण करतात,यातील सूत्रधार एकाचवेळी नाटकाची निर्मिती करणाऱ्या नाटककारांच्या आणि त्याचवेळी सूत्रधाराच्याही नजरेतून पाहात असतो.

वास्तविक ऐतिहासिक, पौराणिक विषयांवर नाट्यलेखन करण्याचा मतकरींचा पिंड नाही. तरीही एक नाट्यलेखनाचा प्रयोग म्हणून 'आरण्यक'साठी महाभारताचा विषय त्यांनी निवडला. त्यांच्या वाचनात आलेल्या 'युगांत' कादंबरी मधील एका परिच्छेदाने त्यांना झपाटले. त्यातील कथाभाग असा होता की, "सर्व महाभारत घडून गेलंय आणि आता धृतराष्ट्र, गांधारी, विदूर, कुंती हे चौघे म्हातारे वानप्रस्थाश्रमासाठी वनवासात एकत्र आले आहेत. वरकरणी मतकरींना यात कथाविषय आढळतच नाही, विशेष घटनाही नाही; पण 'जे नाही' असं त्यांना वाटत होते, त्यातच त्यांना आव्हान आढळले. " त्यानंतर ५,६ वर्षे हा विषय डोक्यात घोळत राहिला. एक दिवस ते नाटक लिहायला बसले. काही संवाद लिहून झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की, हे नेहमीप्रमाणे लिहून होणारे प्रकरण नाही. म्हणून त्यांनी त्यासाठी वेगळा फॉर्म वापरायचे ठरविले. मुक्तछंदातील या नाट्यलेखनात प्रत्येक पात्र मी प्रतिहारी म्हणून बोलू लागले. या नाटकाची आविष्कार पद्धती ही मतकरींचे वेगळेपण दर्शविणारे वैशिष्ट्य ठरले. मुक्तछंदातील हे विचारनाट्य जरी असले तरी ते एक आंतरिक लय, ताल आणि विचारसंगती जपून आहे. त्यातील प्रभावी काव्यात्मकता वाचक, प्रेक्षकांना खिळवून ठेवते.

अशा प्रकारे मतकरींनी नाटक या सांघिक कलेच्या माध्यमातून व्यक्ती ,कुटुंब ,समाज,यांच्या अंतरंगाचा ,मानवी जीवनातील गुंतागुंतीचा शोध घेतला आहे १९७० नंतर त्यांनी याकडे विशेषत्वाने लक्ष्य केंद्रित केलेले दिसते . व त्यात ते यशस्वी झालेत . व्यावसायिक रंगभूमीसाठी नुसते लेखन करून चालत नाही ,तर ते प्रायोगित होणे महत्वाचे असते शिवाय हे नाट्यलेखन तंत्रशरण किंवा प्रयोग शरण न होता प्रेक्षकाना आवाहन करणारे ठरावे ही लक्षात ठेवून मतकरी जाणीवपूर्वक व्यावसायिक नाटयलेखन करीत होते .

## संदर्भ सूची :

१) संपा. मंडळ -डॉ. राजीव नाईक, कमलाकर नाडकर्णी,डॉ.सुधा जोशी,अवधूत परळकर –'रत्नाक्षर','रत्नाकर मतकरी : व्यक्ती आणि साहित्य',नवचैतन्य प्रकाशन ,बोरिवली,मुंबई ,२००६
२) देशपांडे वि. भा.-नाट्यरंग : मुलाखती आणि व्यक्तिलेख,विमल प्रकाशन,पुणे ,१९८६
३) संपा. डॉ. राजीव नाईक –'रत्नाकर'- अंतरकर अरुणा -मतकरी लेखनप्रपंच
४) मतकरी रत्नाकर :वाऱ्यावरचा मुशाफिर -मतकरींच्या निवेदनातून .